राज्यातील मान्यताप्राप्त अनुदानित खाजगी शाळातील कर्मचाऱ्यांना वैद्यकिय सुविधा हृदयशस्त्रक्रिया, हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया, ॲन्जिओप्लास्टी, मुत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रिया व रक्ताचा कर्करोग यावरील औषधोपचार किंमती औषधे, उप... ...साठी लागणारा खर्च भागविण्यासाठी कमाल रुपये ... हजार अग्रीमाची मर्यादा रुपये एक लाखापर्यंत वाढवि...बत

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक-एसएसएन १०००/(३६०/२००१) माशि-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २७ जून, २००१

पहावे: १) शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक-एसएसएन २७८९/३/माशि-२, दिनांक १२ मे १९८९

२) शासन पत्र शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक-एसएसएन २७८९/३/माशि-२, दिनांक २९ मे १९८९

३) सार्वजनिक ... विभाग क्रमांक-एमएजी १०९९/प्र.क्र.२३८/आरोग्य ३ दिनांक २... १९९९

४) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक-एमएजी १०९५/सीआर ४५/आरोग्य ३, दिनांक ४ जुलै, २०००

५) शासन पत्र क्रमांक- विपप्र १०००/(२४६/००)/माशि-२, दिनांक ६ जानेवारी, २००१

**प्रस्तावना :**

शासकीय कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या शासकीय व शासन प्राधिकृत रुग्णालयांमध्ये वैद्यकिय उपचार करुन घेणे व वैद्यकिय खर्चाची प्रतिपूर्ती करुन मिळणे या सवलती वेळोवेळी झालेल्या व होणाऱ्या सुधारणा मान्यताप्राप्त अनुदानित खाजगी प्राथमिक ,माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा व अध्यापक विद्यालये, तांत्रिक शाळा यातील पूर्णवेळ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन क्रमांक-एसएसएन २७८९/३/माशि-२, दिनांक १२ मे, १९८९ अन्वये यथोचित फेरफारासह लागू करण्यात आल्या आहेत.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या शासन निर्णय दिनांक ४ जुलै, २००० अन्वये गंभीर आजारावरील विशिष्टोपचारावरील सध्या असलेल्या रुपये ७५,०००/- इतक्या अग्रीमाची कमाल मर्यादा रु. १,००,००० पर्यंत वाढविण्यास मंजूरी देण्यात आली आहे. सदर निर्णय मान्यताप्राप्त अनुदानित खाजगी प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू राहील अशा सूचना माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालकांना शासनाच्या दिनांक ६ जानेवारी, २००१ च्या पत्रान्वये देण्यात आल्या आहेत. तथापि, याबाबत शासन निर्णय निर्गमित केला जाईल असे आश्वासन विधान परिषदेत देण्यात आले आहे.

**शासन निर्णय :**

शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक-एमएजी १०९५/सीआर-४५/आरोग्य-३, दिनांक ४ जुलै, २००० मधील तरतुद जशाच्या तशा मान्यताप्राप्त अनुदानित खाजगी प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

सदर आदेश दिनाक ६ जानेवारी २००१ पासून अंमलात येतील व त्या दिनांकापर्यंत प्रलंबित प्रकरणांना लागू राहतील. यापूर्वी निर्णित झालेल्या प्रकरणी उर्वरित अग्रीम मंजूर करण्याचे प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

संगणक संकेतांक- 200909112053200१

( वि. वा. सुतार )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे,
शिक्षण संचालक ( प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक),
शिक्षण निरीक्षक ( उत्तर/दक्षिण/पश्चिम), मुंबई.
सर्व लेखा अधिकारी ( शिक्षण विभाग),
महालेखापाल १/२, ( लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर,
महालेखापाल १/२, ( लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
मुंबई लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई.
संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
सर्व जिल्ह्यांचे कोषागार अधिकारी,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद ,
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळ, १७८६, सदाशिव पेठ, पुणे- ४११ ०३०.
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.
वित्त विभाग/नगर विकास विभाग/ग्राम विकास विभाग/समाजकल्याण विभाग/आदिवासी विकास विभाग/उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय.
शालेय शिक्षण विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती- माशि-२